# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ९६३/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.बाळकृष्ण राजाराम पवार,
मु.पो.धामणी, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी ४१५६११.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, कडवई, ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी ४१५६१२

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, कडवई, ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी ४१५६१२

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १०/९/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १७/९/२०२१ | ---- | ८/११/२०२१ | ३०/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१४/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १०/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.उध्दव माने, मंडळ अधिकारी कडवई उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहासे सुपल, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" गाव मौजे धामणी फेरफार क्र.१२८७ मंजूरीचे सर्व प्रकरण त्यामधील अर्ज, प्रतिज्ञा पत्र जोडलेली सर्व कागदपत्रे व आदेश यांचे सह सहीसुद प्रत मिळावी व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.३०/१२/२०२१ रोजी, *"जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी कडवई यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसात पाठवावे."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, ते नव्याने रूजू झालेले असल्याने त्यांनी अद्याप नस्ती तपासलेली नाही. नस्तीचा शोध घेऊन ते माहिती उपलब्ध करून देतील.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ३० दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास मारोती सुपल, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १७/९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे

सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुहास मारोती सुपल, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी **- यांना प्रत --**
-- विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.उध्दव माने,
मंडळ अधिकारी कडवई,
ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.